Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 08 April 2025

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: ०८ एप्रिल २०२५ सकाळी ११.०० वाजता.**

****

प्रधानमंत्री मुद्रा योजनेला आज दहा वर्ष पूर्ण होत आहेत. या योजनेअंतर्गत आतापर्यंत ३२ लाख कोटी रुपयांची ५२ कोटींहून अधिक कर्जं वितरित करण्यात आली आहेत. आर्थिक समावेशन आणि उद्योजकांच्या सक्षमीकरणासाठी सूक्ष्म आणि लघु उद्योजकांना १० लाखांपर्यंतचं तारणमुक्त कर्ज उपलब्ध करून देण्याच्या उद्देशानं ही योजना सुरु करण्यात आली आहे.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सामाजिक संपर्क माध्यमावरच्या संदेशात मुद्रा योजनेतल्या लाभार्थ्यांचं अभिनंदन केलं आहे. गेल्या १० वर्षांत मुद्रा योजनेने असंख्य स्वप्ने प्रत्यक्षात आणली आहेत, ज्यांना पूर्वी दुर्लक्षित केलं गेलं होतं, त्यांना आर्थिक मदत दिली आहे आणि त्यांना यशस्वी होण्यासाठी सक्षम केल्याचं पंतप्रधानांनी म्हटलं आहे.

****

काँग्रेसच्या केंद्रीय कार्यकारिणीची बैठक आज गुजरातमध्ये अहमदाबादच्या सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय स्मारकात तर अखिल भारतीय काँग्रेस समितीची बैठक उद्या साबरमती नदीच्या काठावर होणार आहे. काँग्रेसचे माध्यम आणि प्रसार विभागाचे अध्यक्ष पवन खेरजी यांनी काल ही माहिती दिली. देशभरातून या बैठकांना ३ हजार प्रतिनिधींसह काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी उपस्थित राहणार आहेत.

****

२००८ मध्ये मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील आरोपी तहव्वूर राणा याचा; भारतात प्रत्यापर्णास स्थगिती देण्याची मागणी करणारा अर्ज अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयानं फेटाळला आहे. त्यामुळे राणाच्या प्रत्यापर्णाचा मार्ग मोकळा झाला

आहे. तहव्वूर राणा पाकिस्तानी वंशाचा कॅनेडियन नागरिक असून सध्या तो लॉस एंजेलिस येथील डिटेन्शन सेंटरमध्ये आहे. त्यानं २७ फेब्रुवारीला प्रत्यार्पणास स्थगिती मिळावी यासाठी अर्ज केला होता. भारत आणि अमेरिका यांच्यात १९९७ मध्ये झालेल्या प्रत्यार्पण करारानुसार त्याला भारताच्या ताब्यात दिलं जाणार आहे.

****

इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रामधल्या व्हीव्हीपॅट पावत्यांची शंभर टक्के हातानं मोजणी करण्याचे निर्देश निवडणूक आयोगाला द्यावेत, अशी मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयानं फेटाळली आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना, न्यायमूर्ती संजयकुमार आणि न्यायमूर्ती के व्ही विश्वनाथन यांच्या पीठापुढे काल यावर सुनावणी झाली. संबंधित याचिकाकर्त्यानं दाखल केलेली जनहितार्थ याचिका दिल्ली उच्च न्यायालयानं याआधी फेटाळली आहे. त्या निर्णयात सर्वोच्च न्यायालय हस्तक्षेप करणार नाही, असं या पीठानं सांगितलं.

****

छत्तिसगडमधल्या दंतेवाडा आणि नारायणपूर जिल्ह्यांमधे मिळून काल ३१ नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करली. यातल्या तीन नक्षलवाद्यांना पकडण्यासाठी पोलिसांनी साडेचार लाखाचं बक्षीस जाहीर केलं होतं. नारायणपूर जिल्ह्यात पाच महिला नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करली असून, या प्रत्येकीवर एक लाख रूपयांचं बक्षीस होतं. आत्मसमर्पण केल्याबद्दल या नक्षलवाद्यांना प्रत्येकी २५ हजार रुपयांचा धनादेश प्रोत्साहन योजनेनुसार देण्यात आला.

****

वेव्हज परिषदेच्या माध्यमातून देशात गुंतवणुकीसाठी जगभरातले गुंतवणूकदार भारतात येणार असल्याचं माहिती प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. नवी दिल्लीत ते वार्ताहरांशी बोलत होते. डिजिटल इंडियामुळे अनेक तंत्रज्ञान सुलभतेनं देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचलं आहे. त्यामुळे देशात मोठ्या प्रमाणात डिजिटल कंटेटची निर्मिती होत असल्याचं ते म्हणाले. एक ते चार मे दरम्यान मुंबईत ही परिषद होणार आहे.

****

राज्य शासनाच्या आरोग्य विभागाच्या विविध योजनांचा लाभ सामान्य नागरिकांपर्यंत पोहचवण्यासाठी आरोग्य विभागाने सातत्याने प्रयत्न करणं आवश्यक असल्याचं, विधान परिषदेचे सभापती प्राध्यापक राम शिंदे यांनी म्हटलं आहे. जागतिक आरोग्य दिनानिमित्त मुंबईत आयोजित कार्यक्रमात ते काल बोलत होते. यावेळी विविध

आरोग्य सेवा योजनांचा प्रारंभ करण्यात आला, तसंच आरोग्य विभागात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या डॉक्टर्स, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

****

दरम्यान, डिजिटल स्कूल या संकल्पनेअंतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यातल्या १११ शाळांमध्ये इंटरॅक्टिव्ह टच पॅनल आणि डिजिटल ई लर्निंग सॉफ्टवेअरचं लोकार्पण काल राम शिंदे यांच्या हस्ते दूरस्थ पद्धतीनं करण्यात आलं. आजचं युग हे डिजिटल तंत्रज्ञानाचं आहे, त्यामुळे डिजिटल शिक्षणाचं धोरण स्वीकारणं ही काळाची गरज असल्याचं ते म्हणाले.

****

श्री क्षेत्र पंढरपूर इथं चैत्र एकादशीच्या निमित्तानं आज पहाटे विठ्ठल आणि रुक्मिणीची नित्य पूजा पार पडली. चैत्र यात्रेनिमित्त राज्याच्या विविध भागातून सुमारे तीन लाख भाविक पंढरपुरात दाखल झाले आहेत. आज पहाटे हजारो भाविकांनी चंद्रभागेमध्ये स्नान केलं.

****

रत्नागिरी जिल्ह्यातल्या सर्व मुली आणि महिलांना कर्करोग प्रतिबंधक एच पी व्ही लस देण्यासाठी तालुका स्तरावर शिबिरं आयोजित करण्याचे निर्देश पालकमंत्री डॉ. उदय सामंत यांनी दिले आहेत. या संदर्भात आयोजित बैठकीत ते काल बोलत होते. अंगणवाडी सेविकांच्या समस्यांसंदर्भातली एक बैठकही सामंत यांनी घेतली.

****